तुती व टसर रेशीम उद्योग विकासासाठी
केंद्रीय रेशीम मंडळ पुरस्कृत सिल्क समग्र-ISDSI योजना
राबविणेस प्रशासकिय मान्यता प्रदान करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र. प्रावियो-१०१८/प्र.क्र.९०/रेशीम कक्ष**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:-२४ मे, २०१९

वाचा :- १) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र.रेशीम/कार्या-९/केपुयो-ISDSI/प्र.मा./१८-१९/८०७ दि. ११ जून, २०१८.

**प्रस्तावना :**

रेशीम उद्योग हा शेती व वन संपत्तीवर आधारीत रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. राज्यामधील हवामान हे रेशीम शेतीसाठी पोषक आहे. वातावरणाच्या लहरीपणामूळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच नियमित उत्पन्न मिळविण्यासाठी रेशीम उद्योग हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळवून देण्याचे सामर्थ्य रेशीम शेती व उद्योगांमध्ये आहे. राज्यातील रेशीम उद्योगाचा विस्तार व विकास मोठ्या प्रमाणात व्हावा यासाठी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अनेक योजना कार्यरत आहेत. रेशीम महाअभियानाच्या माध्यमातून राज्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांपर्यंत संपर्क साधून तुती लागवड करू ईच्छीणाऱ्या व टसर रेशीम उद्योग करु ईच्छीणाऱ्या नवीन लाभार्थी नोंदणीसाठी व्यापक प्रमाणावर मोहीम राबविण्यात आली आहे.

२. रेशीम शेतीचा विस्तार व विकास परिणामकारक, तसेच तुती लागवड ते कापड निर्मिती पर्यंतची कोषोत्तर प्रक्रिया या उद्योगाचा एकात्मिक विकास करण्यासाठी समुह पध्दतीने तुती लागवड होणे आवश्यक आहे. तुती रेशीम विकास कार्यक्रम महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत २५ जिल्ह्यांतील १२० समूहांत राबविण्यात येत असून प्रती लाभार्थी एक एकर तुती लागवड इतकी लाभ मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

३. उच्च दर्जाच्या भरघोस तुती पाल्याचे उत्पादन देणाऱ्या तुती वाणांचा प्रसार करणे, गुणावत्तापुर्ण व अधिक उत्पादकता असलेल्या दुबार संकर वाणांच्या रोगमुक्त अंडीपुंज मोठ्या प्रमाणावर निर्मिती, गरजेनुसार अंडीपुंजाचे शितकरण व त्यांचे वितरण, शास्त्रोक्त किटक संगोपन घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसार करणे ह्या घटकांचा कोष उत्पादनापर्यंतच्या प्रक्रीयेपर्यंत मोलाचा वाटा आहे. त्याबरोबर कोषोत्तर प्रक्रीयादेखील महत्वाची असून राज्यात उत्पादीत होणाऱ्या तुती व टसर रेशीम कोषांवर राज्यातच प्रक्रीया होणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय दर्जायुक्त रेशीम सुत निर्मिती, सुतावर व्टिस्टींग, डाईंग, वार्पिंग, वेफ्टींग अशा विविध प्रक्रीया करुन दर्जेदार पैठण्या, रेशमी साड्या व कापड, तयार रेशमी कपडे निर्मिती (गारमेन्ट) ही शृंखला एकसंधपणे पुर्ण करणे ही देखील अत्यंत महत्वाची बाब आहे. राज्यातील येवला, पैठण, नागपूर, औरंगाबाद, अकोला इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात पारंपारिक कारागीरांमार्फत हातमागावर वर्षानुवर्षे पैठणी विणकामाचे तर नागपूर, भंडारा, आंधळगाव इ. ठिकाणी टसर साड्या व कापड निर्मितीचे काम सुरु आहे. पैठणी विणकर त्यांच्यासाठी लागणारा तुती रेशीमचा कच्चा माल-रेशीम यार्न (ताना-बाणा) कर्नाटक, आंध्रप्रदेश येथून मागवून पैठणी विणकाम करीत असतात.

४. वरील पार्श्वभुमीवर केंद्र शासन पुरस्कृत “सिल्क समग्र”- ISDSI (Integrated Scheme for Development of Silk Industry) ही योजना सन २०१८-१९ ते २०१९-२० या कालावधीत राज्यात राबविण्याचे

संचालक (रेशीम) यांनी प्रस्तावित केले आहे. ही योजना राज्यात राबविण्यासाठी केंद्रीय रेशीम मंडळ, बेंगलोर यांनी मान्यता दिली असून **"सिल्क समग्र"**- ISDSI (Integrated Scheme for Development of Silk Industry) **योजना सन २०१८-१९ ते २०१९-२०"** या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

प्रस्तावनेत वर नमूद केल्याप्रमाणे केंद्रीय रेशीम मंडळ पुरस्कृत **"सिल्क समग्र"**- ISDSI (Integrated Scheme for Development of Silk Industry) **योजना सन २०१८-१९ ते २०१९-२०"** या योजनेस तुती व वन्य रेशीम उद्योग विस्तार व विकासाकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व त्याअंर्तगत सोबतच्या **सहपत्र-अ** मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

२. या योजनेची प्रभाविपणे अंमलबजावणीकरीता संचालक (रेशीम) यांनी तुती व वन्य क्षेत्रातील सर्व बाबींची व्यापक प्रचार व प्रसिध्दी करावी. त्याकरीता आवश्यक मागदर्शक सुचना क्षेत्रीय कार्यालयास निर्गमित करण्याची कार्यवाही तात्काळ त्यांचे स्तरावर करण्याची दक्षता घ्यावी. (जसे योजनेची जाहिरात, अर्ज नमुना, मंजूरी पत्र, प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे, करारनामा/बंधपत्र, व्यवसायाचा कालावधी, काही बाबींच्या बाबतीत आराखडा/ नकाशा, साहित्याचा तपशिल, लाभार्थी हिस्सा, लाभार्थी अनुदानाची माहिती ग्रामपंचायतस्तरावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करणे इ.)

३. केंद्रीय रेशीम मंडळाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बाराव्या पंचवार्षिक योजनेतंर्गत राबविण्यात येणाऱ्या तुती व वन्य क्षेत्रातील बाबींचे अनुदान एक लाख रुपये किंवा त्यापेक्षा आधिक (अनेक बाबी मिळून) प्रति लाभार्थी दिले गेल्यास याबाबत लाभार्थी व संचालनालय यांचेमध्ये कायदेशीर करारनामा करणे बंधनकारक राहील. यामुळे योजनेकरीता वितरीत केलेल्या शासकीय अनुदानाचा विनियोग योग्य प्रयोजनासाठीच करणे आवश्यक राहील. अनुदानाचा गैरविनियोग झाल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या अनुदानाची व्याजासह एक रकमी वसुली ही, जमीन महसूल वसूली कार्यपध्दतीनुसार लाभार्थी यांचेकडून करण्यात येईल.

४. लाभार्थ्यांची निवड समूह पध्दतीने करून योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. एकदा एका लाभार्थ्याला लाभ दिल्यानंतर त्याच लाभार्थ्यांला पुन्हा लाभ देण्यात येवू नये किंवा त्या क्षेत्राला (जमीनीचा सर्व्हे नंबर/गट नंबर) पुन्हा लाभ देण्यात येवू नये. देण्यात यावयाच्या लाभक्षेत्राचे प्रमाण निश्चित केलेल्या मर्यादेत राहील.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभाग यांचे सहमतीने, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२३८/१४३१, दि. १९ नोव्हेंबर, २०१८ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.५९/२०१८, दि.२३ जानेवारी, २०१९ वर प्राप्त झालेल्या अभिप्रायावर मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०५२४१४५७३७७५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.05.24 15:02:23 +05'30'

(आ. अ.लोपिस)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन,**

**प्रति,**

१.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ ऑडीट), मुंबई,
२.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / ऑडीट), नागपूर,
३.वरीष्ठ उप महालेखापाल (पडताळणी), बाहय लेखापरिक्षण विभाग (नागरी), मुंबई,
४.सचिव(वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई
५. उप सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई,
६.उप सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई,
७. सर्व जिल्हयांचे जिल्हा कोषागार अधिकारी,
८.नियोजन विभाग (कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई,
९.वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई,
१०.संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत क्र.२, ६वा माळा, बी-विंग, आयुक्त कार्यालय परिसर, सिव्हील लाईन्स,नागपूर-४४० ००१,
११.सहाय्यक संचालक(रेशीम), नागपूर/ अमरावती /पुणे / औरंगाबाद,
१२.सर्व जिल्हयांचे रेशीम विकास अधिकारी,
१३.निवड नस्ती.

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. प्रावियो-१०१८/प्र.क्र.९०/रेशीम कक्ष दिनांक:- २४ मे, २०१९ चे सहपत्र

## "ANNEXURE - A"

## Integrated Scheme for Development of Sericulture with the Assistance of Central Silk Board.

## Schemes Under Mulberry and Tasar Sector to be Implemented by Department of Sericulture. Govt. of Maharashtra

## "सहपत्र - अ"

## एकात्मिक रेशीम विकास योजना "सिल्क समग्र"

## केंद्रीय रेशीम मंडळाच्या सहाय्याने रेशीम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याव्दारे राबविण्यात येणाऱ्या तुती रेशीम व टसर रेशीम योजना.

| Sr. No. | Name of Schemes<br>योजनेचे नांव | Existing Unit Cost (Rs.) | Unit | Sharing Pattern | | | योजनेची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Central | State | Benef. | |
| **I** | Pre-Cocoon - Mulberry Sector | | | | | | |
| **1** | Support for development of kisan nurseries.<br>तुती रोपे तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना. | 1,50,000 | No. | 50% | 25% | 25% | तुती लागवड रोपांच्या सहाय्याने केल्यास नवीन लागवड किटक संगोपनास लवकर तयार होते. तूतीची झाडे जिवंत राहण्याचे प्रमाणे जास्त असते. त्यासाठी प्रति एकर तूती लागवड रोपांचे सहाय्याने करणेसाठी योजना. |
| **2** | Support for Mulberry plantation Development-Raising high yielding mulberry varieties.<br>तुती लागवड विकास कार्यक्रमासाठी सहाय्य योजना. | 50,000 | Acre | 50% | 25% | 25% | राज्यातील तूती लागवडीचे क्षेत्र वाढवीण्यासाठी लाभार्थ्यांना प्रति एकर तुती लागवड जोपासना, खते औषधे इ. करीता सहाय्य योजना. |
| **3** | Assistance for irrigation and other water conservation and usage techniques.<br>तुती बागेसाठी पाणी देण्याच्या सुविधा, पाणी संवर्धन व त्याच्या तंत्राला सहाय्य योजना. | 50,000 | Acre | 50% | 25% | 25% | सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या शेतात पाण्याची सुविधा निर्माण करणे. तुती बागेला ठिबक सिंचन/स्प्रिंकलर लावण्यासाठी राज्यातील लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी योजना. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **4** | Assistance for Constructions of Rearing Houses (RH) - Models I (1000 sq,ft)<br>Models II ( 600 sq,ft )<br>किटक संगोपन गृह बांधणेसाठी सहायता योजना १००० चौ. फुटाकरीता / ६०० चौ. फुटाकरीता | 1,68,639 95,197<br><br>1,68,639 95,197 | Nos | 50% | 25% | 25% | शेतक-यांना किटक संगोपनाकरिता स्वतंत्र संगोपनगृह बांधण्यासाठी कमाल रु. ३०००००/- व किमान रु. २२५०००/- अर्थ सहाय्य प्रस्तावित. स्वतंत्र किटक संगोपनगृहमुळे कोष उत्पादनात वाढ व दर्जेदार कोष उत्पादन होण्यास मदत होते, ही योजना तुती लागवड करुन कोष उत्पादन करण्यासाठी राबवावयाची आहे. |
| **5** | Supply of Rearing Appliances including improved mountages (Rotary Mountages) for quality cocoon production<br>दर्जेदार कोष उत्पादनासाठी - किटक संगोपन साहीत्य /शेती अवजारे साहित्य पुरवठा सहाय्य - आधुनिक माऊंटेज (रोटरी माऊंटेजेस) सहित. | 75,000 | Acre/nos | 50% | 25% | 25% | दर्जेदार कोष उत्पादनाकरीता रेशीम शेती करणा-या शेतक-यांना किटक संगोपन साहित्य व शेती अवजारे पुरवठा करण्यासाठी योजना. यामध्ये रोटरी माऊंटेज यांचा समावेश असुन त्यापासुन एकसमान व दर्जेदार कोष उत्पादान होण्यास मदत होणार आहे. |
| **6** | Prophylactic Measure (includes quality Disinfectant, inputs supply for productivity improvement) support of CBOs.<br>दर्जेदार निर्जुंतूकीकरण औषध व पिक संरक्षण उपाय सुविधा शेतक-यांना पुरवठा करणे. तसेच समुह आधारीत संघटनला मदत करणे. | 5,000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम कोषाचे उत्पन्न घेणारे शेतकऱ्यांना लागणारे विविध प्रकारचे निर्जुंतूकीकरण करण्यासाठी व पिक संरक्षणासाठी विविध औषधांचा पुरवठा करणे व समुह संघटीतांना मदत करणे. |
| **7** | Popularisation of chawki Rearing centre (through RSRS and RECs)<br>बाल्य किटकांच्या बागेची देखभालीसाठी मदत करणे, बालकिटक संगोपन केंद्राचे बांधकाम व बालकिटक संगोपन साहित्य उपलब्ध करण्यासाठी मदत करणे. | 12,00,000 | Nos | 50% | 25% | 25% | समुहातील शेतकऱ्यांना रोगमुक्त बाल्यअवस्थेतील (चॉकी) किटकांचा पुरवठा करण्यासाठी ही योजना राबविण्यास प्रस्तावित आहे. १५-२० लभार्थ्यांना एकाच वेळीस बाल्यकिटकांचा पुरवठा करण्यात येईल. या योजनेमुळे शेतकऱ्यांना किटकांच्या दुसऱ्या अवस्थेपर्यंत संगोपन केलेल्या अळयांच्या पुरवठा होईल. यामुळे शेतकऱ्यांचा ५-६ दिवसांचा वेळ वाचणार आहे. सदरच्या योजनेमुळे कोषाची प्रत व उत्पादना क्षमतेतत वाढ होईल. चॉकी पुरवठयामुळे साधारणत: २५% कोष उत्पादनात वाढ होते. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **8** | Prod'n unit for Biological inputs/Door to Door Service Agents disinfection and inputs supply & Assistance for sericulture poly clinics<br>जैविक किटक संरक्षण<br>उत्पादने/निर्जुंतूकीकरण व निविष्ठांचा पुरवठा करण्यासाठी दारोदार सेवा व रेशीम चिकित्सालयासाठी सहाय्यक योजना. | 1,75,000 | Nos | 50% | 25% | 25% | तुती व रेशीम किटकांवरील विविध किडी व रोग यांचा जैविक पध्दतीने नियंत्रण करण्यासाठी जैविक किटकांचे उत्पादन केंद्र उभारण्याकरीता सहाय्य. किटक संगोपनापुर्वी किटक संगोपन गृहाचे व संगोपन साहित्याचे वेळोवेळी निर्जुंतूकीकरणासाठी खाजगी तत्वावर सेवा देणाऱ्या संस्थेची किंवा व्यक्तिची नेमणुक करुन शेतकऱ्यांच्या दारोदारी जावुन निर्जुंतूकीरण औषधी साहित्य पुरवठा करण्यासाठी लाभार्थ्यांस लागणारे वाहन, फवारणी यंत्रणा इ. खरेदीसाठी मदत करणे. |
| **II** | Post cocoon –Mulberry Sector | | | | | | |
| **1** | Support for Motorized charkha to dissuade child labour.<br>बालमजुरी हटविण्यासाठी मोटारचलीत चरखा सयंत्र उभारण्यसाठी आर्थिक सहाय्य. | 25,000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम सुत निर्मितीमध्ये बालमजुर हटविण्यासाठी व चरख्याच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्यासाठी मोटारीवर चालणारे चरखे उभारण्याकरीता सहाय्य योजना. |
| **2** | Support for existing cottage basin /Domestic basin units for procurement of additional equipment /up gradation.<br>अस्तित्वात असलेल्या कॉटेज बेसीन मशिनचे ऊन्नतीकरण करण्यासाठी आर्थिक सहाय करणे. | 1,99,000 | Nos | 50% | 25% | 25% | सदर योजनेत रेशीम कोषांपासुन सुत निर्मितीकरीता अस्तित्वात असलेल्या कॉटेज बेसीन रिलींग युनिटचे उन्नतीकरण करणे. त्यात कुकिंग बकसरन, रिलींग मशिन, बॉयलर, परमेंशन चेंबर, सोलार जनरेटर या बाबींचा समावेश असुन त्याव्दारे उत्पदान उत्पादकता वाढविता येणार आहे. |
| **3** | Support for Establishment of Multi-end reeling units (10 ends).<br>मल्टीएंड (१० बेसीन युनीट) उभारणीस आर्थिक मदत करणे. | 17,09,000 | Nos | 50% | 25% | 25% | राज्यात बायव्होल्टाईन रेशीम कोषापासुन ग्रेडेबल सूत निर्मिती करणाऱ्यासाठी मल्टीएंन्ड रिलींग (१०बेसीन) केंद्र उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना. सदर मशिन १२-१४ किलो / पाळी ( shift) या नुसार २A - ३A ग्रेड सूताचे उत्पादन. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **4** | Support for Establishment of Automatic Reeling units | | | | | | |
| **I** | 200 Ends unit- Indigenous.<br>स्वयंचलित रिलींग युनिट (२०० एंड) उभारण्यासाठी सहाय्य. | 79,83,000 | Nos | 50% | 25% | 25% | दुबार जातीच्या रेशीम कोषापासुन अंतराष्ट्रीय दर्जाचे ३A- ४A ग्रेडचे कच्चे रेशीम सूत तयार करण्यासाठी मशिन पुावठा. वैयक्तिक उद्योजकाला/गटाला स्वयंचलीत रिलींग युनिट उभारणेची योजना.सदर मशिन **१२-१४** किलो / पाळी ( shift) या नुसार २A - ३A ग्रेड सूताचे उत्पादन. |
| **II** | 400 Ends unit.<br>स्वयंचलित रिलींग युनिट (४००एंड) उभारणीस सहाय्य. | 14102000 | Nos | 50% | 25% | 25% | दुबार जातीच्या रेशीम कोषापासुन अंतराष्ट्रीय दर्जाचे ३A- ४A ग्रेडचे कच्चे रेशीम सूत तयार करण्यासाठी मशिन पुावठा. वैयक्तिक उद्योजकाला/गटाला स्वयंचलीत रिलींग युनिट उभारणेची योजना.सदर मशिन १०० किलो / पाळी ( shift) १२ तासाला या नुसार २A - ३A ग्रेड सूताचे उत्पादन. |
| **5** | Support for Establishment of Automatic Dupion Reeling units.<br>स्वयंचलीत डयुपियान रिलींग युनिट उभारण्यासाठी मदत. | 45,76,000 | Nos | 50% | 25% | 25% | जोडकोष व कमी दर्जाच्या रेशीम कोषाचे रुपांतर डयुपीयान रेशीम सुतामध्ये करण्यासाठी उद्योजकाला स्वयंचलीत डयुपीयान रिलींग युनीट उभारण्यासाठीची योजना. |
| **6** | Assistance for Twisting units (480 ends)<br>रेशीम धाग्याला पिळ देणारे यंत्र उभारणी सहाय्य योजना. | 10,04,000 | Nos | 50% | 25% | 25% | राज्यात तयार झालेल्या कच्या रेशीम सुताला पिळ देण्यासाठी रेशीम उत्पादकांना ४८० स्पींडल यंत्र उभारणेसाठीची योजना. |
| **7** | Support for Establishment of eco de-gumming machine for production of sericin powder.<br>कोषातील डीगमींग काढून त्यातील सेरीसिन पावडर उत्पादन करण्याची योजना. | 10,00,000 | Nos | 50% | 25% | 25% | कोषातील डीगमींग काढून त्यातील सेरीसिन पावडर उत्पादन करण्याची योजना. |
| **8** | Support for Establishment of pupae processing units.<br>प्युपा प्रक्रीया युनिट. | 20,82,000 | Nos | 50% | 25% | 25% | कोषातुन धागा उत्पादित झाल्यानंतर राहीलेल्या प्युपावर प्रोसेसींग करण्यासाठीची योजना |
| **ii a)** | <u>Post cocoon –Vanya Sector</u> | | | | | | |
| **1** | Reeling -cum -twisting Machines.<br>रिलिंगसह व्टिस्टींग सयंत्र उभारणे. | 28,000 | Nos | 50% | 25% | 25% | रिलींग तथा व्टिस्स्टींग यंत्राचा वापर करुन एकाच वेळेस टसर कोषापासून पीळ दिलेल्या धागा निर्मीती करण्यासाठी रिलींग तथा व्टिस्टींग यंत्राची उभारणी करण्याची योजना. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **2** | Wet Reeling Machines.<br>वेट रिंलींग सयंत्र. | 30,000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर कोषांपासून ओले (हॉट एअर ड्रायरमधून ड्राय न केलेले)रेशीम धागा निर्मीती यंत्राव्दारे धागा निर्मीती करण्यासाठी ओले रिलींग यंत्र उभारणीसाठीची योजना |
| **3** | Motorized /Pedal operated Spinning Machines.<br>मोटार चलीत तथा पायाने चालविणे जाणारे कताई यंत्र उभारणेची योजना. | 7,000 | Nos | 50% | 25% | 25% | कताई कारागीरांच्या मिळकतीत वाढ होण्यासाठी टसर रेशीम धाग्याच्या कताईसाठी मोटारचलीत तथा पायाने चालविण्यात येणा-या कताई यंत्र उभारणेसाठीची योजना. |
| **4** | Solar Operated Spinning Machine.<br>सोलार उर्जेवर चालणारे कताई यंत्र उभारणे. | 21,000 | Nos | 50% | 25% | 25% | विद्युत पुरवठा कमी प्रमाणात असलेल्या दुर्गम भागातील टसर रेशीम कताई करणाऱ्या कारागीरांना सौर उर्जेवर चालणारे कताई यंत्र पुरवठयाची योजना. |
| **5** | **Improved Vanya Reeling Machine**<br>**सुधारीत टसर धागाकरण यंत्र** | | | | | | |
| **a** | Unnathi/charkha reeling/Two step reeling cum twisting machines.<br>२ स्टेप रिलींग कम ट्विस्टींग सयंत्र उभारणी करणे. | 28,000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर कोषापासुन एकाच यंत्राव्दारे ओले धागा निर्मिती व ट्विस्टींग केलेल्या धागा निर्मिती करण्यासाठीचे यंत्र बसविण्यासाठी रेशीम धागा निर्मितीसाठीची योजना |
| **b** | Buniyad reeling machines.<br>बुनियादी रिलींग मशिन. | 11,000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर रेशीम अंतर्गत राज्यामध्ये मटका धिचा यार्नचे उत्पादन होते. त्यामध्ये लाभार्थ्याच्या उत्पादन क्षमतेमध्ये मर्यादा असल्याने त्यांना सदर मशनरीचा पुरवठा केल्यास मटक्यावर सुत काढण्याऐवजी मशिनवर सुत उत्पादन करुन उत्पादन व उत्पादकतेमध्ये वाढ होवुनलाभार्थ्यांच्या आर्थिक उन्नतीची योजना. |
| **c** | Kamdhenu reeling machines.<br>कामधेनु रिलींग मशिन. | 23,000 | Nos | 50% | 25% | 25% | वर्टीकल रिलींग कम स्पिनिंग मशिन जी टसर ककुन रिलींग तसेच स्पिनिंग करु शकेल अशा मशिनचा उपयोग करण्याची योजना |
| **d** | Re-reeling Machines (Two window open).<br>चरखा (दोन्ही बाजूनी ओपन). | 21,000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर कापड विणण्यातील वेफ्ट धागा तयार करण्यासाठी CTRTI रांची यांनी विकसीत केलेला आधुनिक चरखा पुरवठा योजना |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **e** | Two Step Reeling cum Twisting Machine. धागाकरण-पिळ देणारे यंत्र / रिलींग व ट्विस्टींगयंत्र. | 25000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर वार्प आणि वेफ्ट दोन्ही प्रकारचा धागा (ताणा व बाणा) उत्पादन करणारी योजना |
| **f** | Tasar reeling machinery Package. टसर धागाकरण पुर्ण यंत्र सामुग्री. | 11,50,000 | Nos | 50% | 25% | 25% | सद्यास्थितीत उत्पादित होणारा धागा वेफ्ट यार्न असून चायनिज / कोरीयन टसर सिल्क धाग्याचा वार्प यार्न म्हणुन उपयोग करण्यात येतो त्यामुळे या मशिनवर उत्पादित होणारा धागा टसर वार्प असून त्याची उत्पादित किमंत ही सद्यास्थितीच्या धाग्यापेक्षा चांगली असेल त्यानुसार सदरचे मशिनरी पॅकेजची योजना |
| **g** | Providing services of Master Reelers / Technicians. मास्टर रिलर्स आणि तंत्रज्ञ यांची सेवा पुरविणे. | 2,52,000 | Nos | 50% | 25% | 25% | राज्यातील खाजगी व संचालनालयातील रिलींग केंद्रात उत्पादीत होणाऱ्या रेशीम सुताची प्रत सुधारण्यासाठी ही योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत केंद्रीय रेशीम मंडळ बंगलोर यांचेकडील तज्ञ असलेले तंत्रज्ञांना पाठविले जाते. त्यांचेकडुन स्थानिक रिलर्स /व्हीवर / ड्रायर व रिलींग कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठीची योजना आहे. |
| **h** | **Support for setting up of Hot Air Driers** | | | | | | |
| **i** | 50 kg. capacity units (Electrical) गरम हवेने कोष सुकविणेसाठी यंत्र खरेदीसाठीची योजना. ५० किलो क्षमतेसाठी विद्युतव्दारे. | 1,50,000 | Nos | 50% | 25% | 25% | बाजारपेठेतील कमी दराचे ओल्या रेशीम कोषाची खरेदी करुन कोष सुकवून टप्प्या-टप्प्याने रेशीम धागा निर्मिती करण्यासाठी सुकविलेल्या कोषांचा वापर करणे. तसेच शेतकऱ्यांनी उत्पादन केलेले कोष वाळवुन साठवणुक करुन ठेवण्यासाठीची योजना. |
| **ii** | 50 kg .capacity units(Multi-fuel). गरम हवा देवुन कोष सुकविणे यंत्र खरेदी योजना. ५० किलो क्षमता (इंधनव्दारे). | 69,000 | Nos | 50% | 25% | 25% | |
| **iii** | 2000 kg. capacity conveyor Hot air Drier. गरम हवा देवुन कोष सुकविणेसाठी यंत्र खरेदीसाठीची योजना. ५० किलो क्षमतेसाठी इंधनव्दारे (२००० किलो क्षमतेसाठी). | 25,17,000 | Nos | 50% | 25% | 25% | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **I** | Support for Handloom Sector-Modified Region specific silk hand looms.<br>सुधारीत रेशीम विशिष्ट हॅन्डलुम योजना. | 33,000 | Nos | 50% | 25% | 25% | उत्पादिन होणारे कच्च्या रेशीम सुतापैकी ६० ते ७० टक्के हॅन्डलुमवर विणकामास वापरण्यात येते. परिणामी कमी उत्पादकता व कमी प्रतीचे कापड उत्पादन होत असल्याने त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सदरची योजना लागू प्रस्तावित केलेली आहे. |
| **J** | Loom Up gradation. | | | | | | जॅकार्डचा वापर करुन अस्तीत्वात असलेल्या हातमागाचे बळकटिकरण करुन उत्पादनमध्ये वाढ होण्यासाठी लाभार्थ्यासाठीची योजना. |
| **i** | Loom up gradation -Loom up gradation through Jacquards,pirn winding and other equipment.<br>अस्तीत्वात असलेल्या हातमागाचे उन्नतीकरण योजना. | 17,500 | Nos | 50% | 25% | 25% | जॅकार्ड, यार्न वाईन्डींग व इतर साहित्य वापरुन हातमागाचे अपग्रेडेशन करुन उत्पादकता वाढविणेसाठीची योजना सीएसआरटीआय, म्हैसुर यांनी विकसीत केलेली न्युमॅटीक लिफ्टींग संयंत्र हातमाग धारकांना पुरवठा करणे |
| **ii** | Pnematic lifting mechanisation -2 loom units.<br>वायवीय उचल यंत्रणा - २ हातमागासाठी. | 38,000 | Nos | 50% | 25% | 25% | केंद्रीय रेशीम प्रशिक्षण व संशोधन संस्था, म्हैसुर यांनी विकसीत केलेली न्युमॅटीक लिप्टींग संयंत्र हातमाग धारकांना पुरवठा करणे.ही योजना विणकरांचे कष्टप्रद काम कमी करण्यासाठी आणि उत्पादकता वाढविण्यासाठीची योजना आहे. |
| **iii** | Pnematic lifting mechanisation -4 loom units.<br>वायवीय उचल यंत्रणा - ४ हातमागासाठी. | 58,000 | Nos | 50% | 25% | 25% | |
| **iv** | Electronic Jacquard (480 hooks)with pneumatic lifting mechanism.<br>इलेक्ट्रानीक जेकार्ड (४८० हुक्स) वायवीय यंत्रणा. | 1,75,000 | Nos | 50% | 25% | 25% | मेकॅनिकल जॅकार्ड ऐवजी इलेक्ट्रानिक जेकार्डची उभारणी करुन वेगवेगळया डिझाईनची किमंत कमी करणे व उत्पादकता वाढविणेसाठीची योजना |
| **K** | Computer Aided Textile Designing (CATD) units.<br>संगणक ॲडेट टेक्सटाईल डिझाईनिंग. | 5,75,000 | Nos | 50% | 25% | 25% | संगणकाच्या सहाय्याने रेशीम कापडावर विविध प्रकारची डिझाईनिंग करुन रेशीम कापडामध्ये आकर्षकता निर्माण करणे करीताची योजना. |
| **l** | **Common Facility Centre (CFC )for silk yarn dyeing and fabric processing** | | | | | | |
| **i** | Tub dyeing unit-25 kgs. Capacity.<br>धागा रंगविणे -२५ कि.कॅपॅसिटी. | 5,70,000 | Nos | 50% | 25% | 25% | २५ कि.ग्रॅ.-५० कि.ग्रॅ. क्षमतेच्या टयुब डाईंग - रेशीम कापडांना रंगणी करण्यासाठीचे सयंत्र उभारणेसाठी मदत करण्यासाठीची योजना. |
| **ii** | Tub dyeing unit 50 kgs capacity.<br>धागा रंगविणे -५० कि.कॅपॅसिटी. | 8,50,000 | Nos | 50% | 25% | 25% | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **iii** | Arm dyeing unit 50 kgs capacity.<br>आर्म डाईंग ५० कि.ग्रॅ. कॅपॅसीटी. | 21,00,000 | Nos | 50% | 25% | 25% | कापडाच्या रंगरंगोटीमध्ये एकसारखेपणा येण्यासाठी रंगणी मशिन उभरणीची योजना |
| **iv** | Fabric Processing unit-250 kgs capacity.<br>कापड प्रक्रिया सुविधा २५० कि.ग्रॅ. क्षमता. | 31,50,000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम सुतापासुन तयार केलेल्या कापडावर विविध प्रकारची प्रक्रिया करण्यासाठीची कॉमन सुविधा केंद्राची उभारणी करणे. |
| **v** | Effuent Treatment Plant-Zero discharge type.<br>पाणी प्रदुषण मुक्त करणेची योजना (EPP). | 12,50,000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम धागा डाईन आणि रेशीम कापड प्रक्रीया केले नंतर जे पाणी प्रदुषण युक्त होते त्या पाण्यावर ट्रीटमेट करुन (प्रक्रीया) करुन प्रदुषण मुक्त करण्यासाठीची योजना (Pollution Control Borad यांच्या निकषानुसार) पाण्याचा उपयोग करणे |
| **vi** | Effluent Treatment plant - Disch. to Ground type.<br>खराब पाणी शुध्द करण्याची योजना. | 7,00,000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम धागा डाईंग आणि रेशीम कापड प्रक्रीया केल्यानंतर पाणी प्रदुषणयुक्त होते त्या पाण्यावर ट्रीटमेट करुन (प्रक्रीया) करुन प्रदुषण मुक्त करण्यासाठीची योजना (Pollution Control Borad यांच्या निकषानुसार) जमीनीमध्ये पाणी सोडणे |
| **vii** | Fabric Finishing units.<br>फॅब्रिक फिनिशिंग युनिट. | 9,00,000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम कपडा तयार केल्यानंतर त्यास फिनिशिंग करण्याबाबतचे कामकाज. |
| **B** | **Seed Organization बिज संघटण** | | | | | | |
| **B (i)** | **Mulberry Sector तुती रेशीम विभाग** | | | | | | |
| **1** | Mobile Disinfection Unit Comprising of Motor Cycle (100 CC) &1 HP Power sprayer with accessories.<br>फिरते निर्जुंतूकीकरण युनिट. | 1,50,000 | Nos | 50% | 25% | 25% | शेतकऱ्यांना त्यांच्या क्षेत्रावर जावुन प्रत्यक्ष निर्जंतूकरणाचा फायदा देण्यासाठीची योजना. |
| **2** | Strengthening of Mulberry Silkworm Seed Rearers (ASR ) for quality seed cocoon Generation<br>तूती रेशीम - बिज कोष उत्पादकांचे बळकटीकरण | 10,00,00 | Nos | 50% | 25% | 25% | अंडिपुंज निर्मितीसाठी लागणारे बिजकोष उत्पादक शेतक-यांचे बळकटीकरण करण्यासाठीची योजना. |
| **3** | Revolving Capital fund support for state Grainages and RSPs.<br>खेळते भांडवल योजना. | 18,00,000 | Nos | 50% | 25% | 25% | राज्यातील अंडिपुंज निर्मिती केंद्र व नोंदणीकृत अंडिपुंज उत्पादकांना खेळते भांडवल उभारणीसाठ्ठीची योजना. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **4** | Assistance for purchasing seed testing equipment for state and private RSPs.<br>दर्जेदार अंडिपुंजाचे उत्पन्न होण्यासाठी शासकीय/खाजगी ग्रेनेजला बिज परिक्षण साहित्य पुरवठाकरीता सहाय्यता योजना. | 1600000 | Nos | 50% | 25% | 25% | तुती रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी अंडीपुंज निर्मिती केंदाचा (ग्रेनेजच्या) दर्जा सुधारणासाठी खाजगी व शासकीय ग्रेनेजला मदत करण्यासाठीची योजना. |
| **5** | Support to upgrade State and Private large scale industrial seed production units and cold storage facilities<br>राज्यातील शासकीय व खाजगी अंडिपुंज निर्मिती करणारे युनिटसाठी व सहाय्य व शितगृहाची उभारणी. | 44760000 | Nos | 50% | 25% | 25% | राज्यातील शासकीय व खाजगी अंडिपुंज निर्मिती करणारे केंद्रासाठी सहाय्य करणे. त्याव्दारे उत्पादीत झालेले अंडिपुंजाच्या जतनीकरनासाठी शितगृहाची उभारणी करण्यासाठीची योजना. सदर योजनेमुळे मध्यवर्ती ठिकाणी अंडिपुंजाची साठवणुक करुन शेतकऱ्यांना वेळेत तसेच गुणवत्तापूर्णपणे अंडिपुंजाना जतन व मागणीप्रमाणे वितरण करता येईल. |
| **B (2)** | Vanya Seed Sector **वन्य रेशीम बिज विभाग (टसर)** | | | | | | |
| 1 | Assistance to Adopted Private Tasar Graineurs<br>खाजगी टसर अंडिपुंज निर्मितीसाठी सहाय्य. | 500000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर अंडिपुंजाची वाढती मागणी लक्षात घेता खाजगी अंडिपुंज निर्मिती केंद्र उभारण्यासाठी योजना आहे. |
| **2** | Assistance for strengthening of Tasar seed multiplication infrastructure (Tropical Tasar) Establishment of Basic seed Production unit<br>टसर बिज गुणन केंद्र बळकटीकरणासाठी सहाय्य. | 6000000 | Nos | 50% | 25% | 25% | शासकीय मडहाऊस अंडिपुंज केंद्राची बळकटीकरण करण्यासाठीची योजना. दर्जेदार टसर अंडिपुंजाची निर्मिती करणे करीता योजना. राज्यातील टसर क्षेत्र असलेल्या जिल्हयात राबविण्यात येईल. |
| **3** | Assistance for Tasar Tropical Rearers for development of chawki garden, maintenance of existing tasar plantation and disinfectant support.<br>उष्ण कटिबंधिय टसर अंडिपुंज संगोपन करणाऱ्या टसर लाभार्थ्यास सहाय्यता योजना. | 55000 | Nos | 50% | 25% | 25% | टसर लाभार्थ्यास किटक संगोपन साहित्य, खते पुरवठा करणे, अर्जुन व ऐन वृक्षाची देखभाल करुन गुणवत्तापुर्ण बिजकोष उत्पादन तयार करण्यासाठी सदर योजना राबविण्यात येईल. |
| **C** | Capacity Building **क्षमता बांधणी** | | | | | | |
| **1** | Beneficiary Empowerment Programme.<br>लाभार्थी उद्योजक सबळीकरण कार्यक्रम व त्या अनुषंगाने अभ्यास दौरे. | 7000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम उद्योजक शेतकरी व सुत उत्पादक यांच्या कौशल्याला चालना देण्यासाठी वृध्दींगत करण्यासाठी प्रशिक्षण /अभ्यास दौरे रेशीम शेतीचे नविन तंत्रज्ञान अवगत करण्यासाठीचे योजना. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **2** | Sericulture Resource Centres(SRC).<br>रेशीम संशोधन केंद्र उभारणे. | 400000 | Nos | 50% | 25% | 25% | रेशीम शेती समुहातील शेतकरी व इतर रेशीमच्या व्यवसायातील इतर लाभार्थ्याना प्रशिक्षण तथा सुविधा केंद्राची स्थापन करण्यासाठीची योजना. |
| **3** | Skill Training & Enterprise Development Programmes (STEP).<br>कौशल्य प्रशिक्षण व उद्योजक विकास योजना. | 10000 | Nos | 50% | 25% | 25% | राज्यातील रेशीम विस्तार व विकासाअंतर्गत रेशीम उद्योजक शेतकरी, रिलर्स, व्हिवर, एंटरपृनर तसेच तांत्रीक कर्मचारी यांचेसाठी कौशल्य प्रशिक्षण व उद्योगजक विकास योजना |
| | **सामान्य लाभार्थी सहभाग** (General Sharing Pattern) - ५०:२५:२५ (CSB : State : Beneficiary) **(केरेमं : राज्य : लाभार्थी)** | | | | | | |
| | SCSP / TSP **लाभार्थ्यांसाठी अनुदान सहभाग** - ६५:२५:१० (CSB : State : Beneficiary) **(केरेमं : राज्य : लाभार्थी)** | | | | | | |
| | * Project Monitoring Committee (PMC), Meeting held on ५ June २०१८ at Nagpur Decided flows | | | | | | |
| | १. The beneficiaries other than MGNREGS to be covered under the ISDSI scheme for Mullberry Plantation, Construction of Rearing house and supply of rearing appliances. | | | | | | |
| | २. The beneficiaries can undertake mulberry plantation of improved mulberry variety on minimum १.०० acre to ५.०० acre as per ISDSI norms. The unit cost for this scheme i.e.Rs.५००००/- per acre and sharing pattern is as per ISDSI scheme. | | | | | | |
| | ३. The unit cost for Rearing House for the model - I (१००० sq.Ft.) is modified and fixed Rs.१६८६३९/- and for model- II (६००sq.Ft.) is modified and fixed as Rs.९५१९७/- as per MGNREGS unit cost in the State. The sharing pattern is as per ISDSI norms. | | | | | | |
| | ४. The PMC decided that under ISDSI scheme one beneficiary will be provided with the assistance for Mulberry plantation up to ५ acre only, Assistance for construction of one rearing house only and one set of Rearing appliances. The unit cost for construction of Rearing House will be as per prevailing MGNREGS norms for state sericulture. | | | | | | |